




Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
त्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com








वर्ष ३ रे अंक : २७४ वा गुरुवार दि. ०२ जानेवारी २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये


# भ्रष्टाचारी व गुन्हेगारांना आरोग्य उपसंचालक अकोला यांचे संरक्षण?

## पाच महिने होऊन देखील महाभ्रष्टाचारी बोथेंवर कारवाईस चालढकल...

जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्रभर गाजत असलेल्या येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात लायकी नसताना-ही भांडारपाल या पदावर बसून निर्लज्जपणे आणि बेबंदपणे भ्रष्टाचार करणाऱ्या भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे यांच्यावर विभागीय चौकशी बसवण्यात आली होती. त्या चौकशीत भांडारपाल बोथे यांचा भ्रष्टाचार पूर्णपणे उघड झाला, तसेच त्यांनी भ्रष्टाचारातून बेशरमपणे जी करोडो रुपयांची संपत्ती गोळा केली, ती चल अचल संपत्ती जप्त करण्याची शिफारस विभागीय चौकशीत करण्यात आली होती. परंतु यानंतरही गेल्या पाच-सहा महिन्यांपासून ही कारवाई करण्यात आरोग्य उपसंचालक अकोला डॉ. कमलेश भंडारी हे टाळाटाळ करीत आहेत. त्यामुळे आता खुद्द आरोग्य उपसंचालक अकोला हे भ्रष्टाचारी व गुन्हेगारांना संरक्षण देऊन त्यांना वाचवण्याचे काम करीत आ-हेत का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात कोट्यवधी नव्हे तर अब्जावधी रुपयांचा भ्रष्टाचार गेल्या काही वर्षांमध्ये झालेला आहे, ही बाब आता सूर्यप्रकाशाएव्हढी स्वच्छपणे समोर आली आहे. विविध प्रकारच्या चौकशी समित्या व अधिकाऱ्यांच्या अहवालात हे पूर्णपणे दिसून आलेले आहे. चौकशी समित्या स्थापन झाल्या, त्यांचे अहवालदेखील आले, अह-वालात अनेकांवर ठपकाही ठेवण्यात आला, परंतु कारवाई मात्र कोणावरही होताना दिसून येत नाही. जिल्हा रुग्णालय प्रशास-नात जे भ्रष्टाचारी शुक्राचार्य बसलेले आहेत, त्यापैकी एक प्रमुख नाव म्हणजे भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे. हे प्रकाश बोथे म्हणजे एक अजबच रसायन आहे. प्रकाश बोथे यांची जिल्हा रुग्णालयात पोस्ट ही केवळ एका वाहन चालकाची. परंतु तरीही त्यांना कनिष्ठ लिपिक पदावर नेमणूक करण्यात आली. त्यानंतर त्यांना भांडारपाल बनवण्यात आले. खरेतर भांडारपाल बनवण्याइतकी त्यांची शैक्षणिक पात्रता नाही आणि बौद्धिक कुवतदेखील नाही. तरीही या व्यक्तीला अवैधरित्या तत्कालीन अधिकाऱ्यांनी शेण खात बोथेंना या पदावर बळजबरी बसवले. त्यानंतर बोथे यांनी भांडारपाल या पद-ावर राहून प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार केला. यामध्ये सेंट्रल पाईपलाईनचे कामात भ्रष्टाचार, कार्यालयीन फर्निचर-कुलर्स यामध्ये भ्रष्टाचार, बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंट सिस्टीम खर-ेदीत भ्रष्टाचार, व्हेंटीलेटर खरेदीत भ्रष्टाचार, ऑक्सिजन कॉन्स्ट्रेटर स्प्रे पंपमध्येमध्ये भ्रष्टाचार, मोबाईल एक्स-रे युनिट, डायलिसीस मशीन खरेदी या सर्व प्रकारात प्रचंड गैरप्रकार व भ्रष्टाचार केले. भांडारपाल पदावर असताना बोथेंनी कादपत्रांमध्ये प्रचंड हेरफेर केलेली आहे. अनेक नियम मोडून कामकाज पुढे रेटले. आपल्याच अधिकाऱ्यांच्या आदेशांना केराची टोपली दाखवली. आपल्या अधिकारांच्या बाहेर जाऊन काम केले. हे सर्व भ्रष्टाचारी प्रकाश बोथे यांनी नालायक आणि बदमाश अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने पार पाडले.दैनिक जनसंचलन व सिटी






**उपसंचालक अकोला डॉक्टर कमलेश भंडारी आपण पदोन्नती होण्याअगोदर चौकशी समितीचे प्रमुख होते आपणच कॅमेरासमोर मुलाकात दिली होती की आताही विभागीय चौकशी शेवट असून जो कोणी दोषी असेल त्यावर फौजदारी कारवाई करण्यात येईल तरी आपणास विभागीय चौकशी समितीचा ऑगस्ट २०२४ च्या महिन्यात पत्र मिळाले असून भंडारपाल प्रकाश नामदेव बोथे यांच्यावर सर्व आरोप सिद्ध होऊनही आपण कारवाईस टाळाटाळ करत असल्याचा चित्र आहे**

न्यूजचा वृत्तमालिकेच्या माध्यमातून सत-तचा पाठपुरावा आणि सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांनी वरिष्ठांकडे केलेली तक्रार, यामुळे अखेर बोथे यांची विभागीय चौकशी करण्यात आली. या चौकशीत प्रकाश नामदेव बोथे यांची अनेक पापे स्पष्टपणे उघड झाली. चौकशी समितीतील अधिकारी देखील प्रकाश बोथे यांच्या भ्रष्टाचाराचे प्रकार पाहून अक्षरशः चक्रावून गेली होती. चौकशी समितीने आपल्या अहवालात अनेक धक्कादायक खुलासे करीत बोथे यांच्या भ्रष्टाचारी पापांचा भंडाफोड केलेला होता. याशिवाय प्रकाश बोथे यांच्यावर तात्काळ फौजदारी कारवाई करून त्यांची चल अचल संपत्ती जप्त करण्याची शिफारस केली होती, तसेच येणारी रक्कम ही शासनजमा करावी, असा सल्लाही दिला होता.खरे तर डॉ. कमलेश भंडारी हे देखील या चौकशी समितीत होते. आता ते विद्यमान आरोग्य उपसंचालक आ-हेत. त्यामुळे या अहवालावरून डॉ. भंडारी यांनी कारवाई करणे गरजेचे होते. मात्र, पाच महिने उलटून देखील ना बोथेंवर फौजदारी करावाई झाली, ना त्यांची अवैध संपत्ती जप्त झाली ना ती शासन जमा झाली. खरे तर यातून डॉ.भंडारी हे किती ढिसाळ कारभार हाकणारे आहेत हे दिसून येते आणि दुसरीकडे ते बोथेसारख्यांवर कारवाई न करून एक प्रकारे भ्रष्ट व गुन्हेगार लोकांना वाचवण्याचे काम करीत असल्याचे सिद्ध करीत आहेत. त्यामुळे जर डॉ. भंडारी हे खरंच कार्यक्षम असतील, त्यांनी कुठलाही विचार न करता आपल्याच समितीतील अहवालानुसार प्रकाश बोथे यांच्यावर कारवाई करावी. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज जोपर्यंत बोथेसारख्या भ्रष्टाचाऱ्यांवर आणि बोथेंना वाचवणाऱ्यांवर कारवाई होत नाही, तोपर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज शांत बसणार नाही.

अजून बरेच काही पुढील भागात...

## बनावट कागदपत्राद्वारे जमीन हडपली बापलेकावर गुन्हा दाखल...

जनसंचलन/ खामगाव

तालुक्यातील ढोरपगाव येथील आईच्या ना-वावर असलेले शेत मुलाने त्याच्या मुलाच्या नावावर करण्यासाठी बनावट मुखत्यारपत्र व बक्षीसपत्र बनविल्याचा प्रकार घडल्याने खामगाव येथील प्रथमवर्ग न्यायालयाने याप्रकरणी आरोपीवर खामगाव शहर पोलिसांना गुन्हा दाखल करण्याचा आदेश दिला. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला. खामगाव तालुक्यातील ढोरपगाव येथील गोकुळाबाई ओंकार खोटाळे यांच्या नावावर मौजे ढोरपगाव येथील शेत गट नं. २६, क्षेत्रफळ ५ हे. ७१ आर पैकी ० हे. ७६ आर शेतजमीन आहे. हे शेत गोकुळा खोटाळे यांचा मुलगा मुलगा दीपक महादेव खोटाळे याच्या नावाने करण्यासाठी बनावट मुखत्यारपत्र व बक्षीसपत्र तयार केल्याचा प्रकार न्यायालयात उघड झाला. याप्रकरणी खोटाळे यांनी प्रथमवर्ग न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने यामध्ये भारतीय सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १७५ (३) अन्वये चौकशी करून आरोपींविरोधात भान्यासं कलम ३१८ (४), ३३७, ३३६ (३), ३ (५) नुसार गुन्हा दाखल करण्याचा आदेश खामगाव शहर पोलिसांना दिले. त्यानुसार पोलिसांनी




महादेव खोटाळे आणि दीपक खोटाळे यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला. याप्रकरणी तक्रारकर्त्याच्या वतीने ॲड. सुरेंद्र राठी व ॲड. अंकित के. शर्मा यांनी काम पाहिले आहे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जिल्हास्तरीय शालेय(मुले) फुटबॉल लिग स्पर्धा१० जानेवारीपर्यंत अर्ज आमंत्रित

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा फुटबॉल संघटना बुलढाणाद्वारे १३ वर्ष वयोगटातील शालेय प्रतिभावंत खेळाडुंचा शोध घेण्यासाठी जिल्हास्तरीय फुटबॉल (मुले) सन २०२५-२६ शालेय लिग स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी १० जानेवरीपर्यंत अर्ज सादर करावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस. महानकर यांनी केले आहे.

जिल्ह्यातील सर्व शाळेतील १३ वर्ष वयोगटातील खेळाडुंना स्पर्धेमध्ये सहभागी होण्याकरीता जिल्ह्यातील विविध शाळेतील संघाची नोंदणी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे ऑफलाईन विनामूल्य नोंदणी करून संघाची यादी दि.१० जानेवारीपर्यंत कार्यालयात जमा करून प्रवेश निश्चित करावा. सदर स्पर्धेसाठी खेळाडूंची वयोमर्यादा १ जानेवारी २०१२ नंतरचा जन्म झालेला खेळाडु सदर स्पर्धे करीता पात्र राहील. स्पर्धेची तारीख आपणास नंतर कळविण्यात येईल. सदर स्पर्धेकरीता जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.



जास्तीत जास्त संघानी सहभाग नोंदवुन स्पर्धा यशस्वी करण्यास सहकार्य करावे. अधिक माहितीसाठी एन.आर. वानखेडे ९९६०४३४४८७, एस.एस.केळे ९४२३४४६५१६ व डॉ. जे. डब्ल्यु मोहोड ९४०५७३४४०३ यांच्या भ्रमणध्वनीवर संपर्क करावा.

# नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी महसूल विभागाच्या तलाठ्यांची कामावर दांडी , कारवाई कडे लक्ष

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

तालुक्यातील मलकापूर पांग्रा मंडळ विभागात एक मंडळ अधिकारी सहा तलाठी असून आज नवीन वर्ष सुरुवातीलाच सर्व कार्यालय बंद असल्याचे दिसून आले नेहमीच असलेले नेहमीच गैरहजेर व नवीन वर्षाच्या सुरुवातीला तलाठी हजर राहत नसल्याने कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांना चांगलाच त्रास सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे तलाठी केव्हा येणार याची माहितीही नागरिकांना मिळत नसल्याने करावे तरी काय, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. मलकापूर पांग्रा ग्रामपंचायत सचिवलयाच्या मागे परिसरात तलाठ्यांचे कार्यालय आहे. खेड्यापाड्यातील नागरिकांच्या सोयीसाठी हलक्याच्या ठिकाणी राहणे सोडून अनेक तलाठी या कार्यालयातूनच तलाठी त्यांचा कारभार सांभाळतात. त्यामुळे खेड्यापाड्यातील नागरिकांना त्यांच्या कामासाठी दहा ते पंधरा किलोमीटरपर्यंत प्रवास करून मलकापूर येथे यावे लागते. मलकापूर पांग्रा तलाठी कार्यालयात आल्यानंतरही तलाठ्याची भेट होईल, याची काहीही शक्यता नाही. कोणी कुठे तर कोणी कुठे असा सर्व प्रकार पाहावयास मिळत आहे. नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच तलाठी कार्यालयात बंद असल्याचे दिसून आले . तलाठी कार्यालयात



तलाठी कार्यालयात सतत गैरहजर असतात तर मलकापूर पांगरा येथील ग्रामपंचायत सदस्य असून सामान्य माणसाची कामे घेऊन येत असतो माझे तर काम होत नाही तर सामान्य नागरिकांचे स्थिती काय असेल
**राजू साळवे**
**ग्रामपंचायत सदस्य**

सदर प्रकाराची दखल घेऊन तलाठ्याला जाब विचारण्यात येईल . तहसीलदारांना या विषयी बोलून माहिती मागविली असून योग्य ती कारवाई करण्यात येईल-
**उपविभागीय अधिकारी**
**प्रा. संजय खडसे.**

कामानिमित्त अनेक नागरिक आले होते. परंतु तलाठी हजर नसल्याने प्रतीक्षा करण्या पलीकडे त्यांच्याकडे काहीही इलाज नव्हता. परंतु ताटकळत बसलेले नागरिक पुन्हा आपल्या गावाकडे निघून गेले नवीन वर्षानिमित्त तलाठ्यांना सुट्टी तर नाही असं प्रश्न नागरिकांच्या मनात निर्माण झाला . परंतु हे सर्व नित्याचे झाले आहे नवीन वर्षाचे तर कार्यालयात तलाठीच हजर नव्हते. तर त्यांचे कार्य कुलूप लावलेले होते याबाबत माहिती द्यायलाही कोणी तयार नव्हते. भाग एकचे तलाठी श्री बावस्कर व कोतवाल यांना वगळता , हनुमान नगर येथे ढोरवी ,वाघाळा कार्यालय आहे तेथे कार्यालय बंद असल्याचे दिसून आले. त्यामुळे परिसरातील शेतकरी प्रचंड त्रस्त झाले असल्याचे दिसून येत आहे. तहसीलदारांनी लक्ष द्यावे व तलाठ्यांना कार्यालयात थांबण्याबाबत आदेश द्यावे, अशी मागणी परिसरातून करण्यात येत आहे.

# जिल्ह्यातील खरीप हंगामाची अंतिम पैसेवारी जाहीर

**जनसंचलन/बुलढाणा**

सन २०२४-२५ च्या खरीप हंगामातील प्रमुख पिकांची जिल्ह्याची सरासरी अंतिम पैसेवारी ५१ पैसे इतकी जाहीर करण्यात आली आहे. जिल्ह्यात एकूण १ हजार ४२० गावे आहेत. यातील १ हजार ५८ गावांची खरीप हंगामाची अंतिम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आहे. तर ३६२ गावांची पैसेवारी ही ५० पैशांपेक्षा जास्त आहे.

५० पैसपेक्षा कमी अंतिम पैसेवारी : देऊळगाव राजा येथे ६४, मेहकर येथे १६१, लोणार येथे ९१, सिंदखेड राजा येथे ११४, मलकापूर येथे ७३, नांदुरा येथे ११२, खामगाव येथे १४६, शेगांव येथे ७३, जळगांव जामोद येथे ११९ व संग्रामपूर येथे १०५ असे एकूण १ हजार ५८ गावांची पैसेवारी ही ५० पैशांपेक्षा कमी आहे.

५० पैसपेक्षा जास्त अंतिम पैसेवारी : बुलढाणा तालुक्यात ९८, चिखली येथे १४४, मोताळा येथे १२० असे एकूण ३६२ गावे गावांची पैसेवारी ही ५० पैशांपेक्षा जास्त आहे.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होणाऱ्या गट ब व क सेवा संयुक्त पुर्व परीक्षेच्या वेळापत्रकात बदल

**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून महाराष्ट्र गट-ब(अराजपत्रित) व गट क सेवा सयुक्त पुर्व परिक्षा रविवार दि. ५ जानेवारी २०२५ व रविवार दि. २ फेब्रुवारी २०२५ रोजी नियोजित होत्या. तथापि दि. २३ डिसेंबर २०२४ च्या आयोगाचे पत्रानुसार नियोजित परीक्षांच्या दिनांकामध्ये बदल करण्यात आला असून महाराष्ट्र गट ब(अराजपत्रिका) सेवा संयुक्त पुर्व परिक्षा रविवार दि. २ फेब्रुवारी २०२५ रोजी तर महाराष्ट्र गट क सेवा सयुक्त पुर्व परीक्षा रविवार दि. ४ मे २०२५ रोजी होणार आहे. सुधारित परिक्षांच्या वेळपत्राकाचे सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन अपर जिल्हादंडाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे यांनी केले आहे.

# केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचा जिल्हा दौरा

**जनसंचलन/बुलढाणा**

केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव गुरुवार दि. २ जानेवारी २०२४ रोजी बुलडाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या दौऱ्यानुसार दि. २ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता मेहकर येथून मोटारीने बुलढाणाकडे प्रस्थान. दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी



कार्यालय, बुलढाणा येथे आगमन व सोयीनुसार मातोश्री शिवाजी नगर मेहकरकडे प्रयाण करतील.



# २०२४ संपले असून २०२५ मध्ये सर्व नागरिकांनी सायबर गुन्हेगारांपासून सावधान रहा...

## ठाणेदार अमरनाथ नागरे यांचे आवाहन...

जनसंचलन/मेहकर

डोणगाव प्रतिनिधी अनिल राठोड २०२४ मध्ये सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ झाली असून नवीन वर्षा निमित्त २०२५ ला सर्व नागरिकांनी सायबर गुन्ह्यापासून सावध राहावे गेल्या काही दिवसांपासून सायबर क्राईमच्या घटनेत वाढ होत आहे. त्यातच आता काही सायबर चोर बँकेचे अधिकारी, पोलीस अधिकारी असल्याचे सांगत फसवणूक करत आहेत. यामुळे पोलिसांकडून वारंवार सतर्क राहण्याचे आवाहन केले जात आहे. पण जर तुम्ही सतर्क राहिला नाहीत, तर मोठी फसवणूक होऊ शकते. २०२४ हे वर्ष संपले असुन. यातच गेल्या वर्षीचे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. डोणगाव येथून जवळच असलेल्या शेलगावदेशमुख येथील एकजण सायबर गुन्ह्याचा शिकार होता होता वाचला आहे. एका स्कॅमरने स्वतःला पोलीस अधिकारी असल्याचे रविवारी सकाळी दहाच्या दरम्यान सांगत कॉल केला. यावेळी तो सायबर चोर त्याच्याकडून माहिती घेण्याचा प्रयत्न करत होता. मात्र त्याच्याहुशारीमुळे तो बचावला आणि स्कॅम करणाऱ्याचा गुन्हा उघडकीस आला. सदर घटनेची माहिती डोणगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार अमरनाथ नागरे यांना दिली असता तुमच्या सतर्कतेमुळे मोठी फसवणूक टळली असल्याची म्हटले तर सर्वच नागरिकांनी ऑनलाईन फसवणुकी संदर्भात व अनोळखीच्या व्यक्तींची सोशल मीडियावर होणाऱ्या चर्चेदरम्यान गोपनीय गोष्टी तसेच आर्थिक व्यवहाराच्या बाबी सांगु नये व



तसेच कोणी अधिकारी म्हणून बोलतात व वेगवेगळ्या गुन्हात तुमचे नाव आले असे सांगून दडपण आणण्याचा प्रयत्न करत असल्यास त्वरित जवळच्या पोलीस स्टेशनची संपर्क साधावा ज्यामुळे आपली आर्थिक फसवणूक होणार नाही असे आवाहनही ठाणेदार अमरनाथ नागरे यांनी नागरिकांना केले.

# भीमा कोरेगाव २०७ वा शौर्यदींना निमित्य बुलढण्यात विजयस्तंभाची मिरवणूक...

जनसंचलन/बुलढाणा




आज भीमा कोरेगाव येथे २०७ वा शौर्य दिन साजरा करण्यात येत आहे.. हा शौर्यदिन राज्यात ठिकठिकाणी साजरा करण्यात येत आहे.. २०७ वर्षाअगोदर भीमा कोरेगाव येथे कोरेगावची लढाई (अन्य नावे: कोरेगाव भिमाची लढाई, भिमा कोरेगावची लढाई) ही महाराष्ट्राच्या पुणे जिल्ह्यामधील कोरेगाव भिमा या गावात भीमा नदीच्या काठावर झालेली एक ऐतिहासिक लढाई आहे. ही लढाई १ जानेवारी, इ. स. १८१८ रोजी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी आणि मराठा महासंघाच्या पेशवा गटामध्ये झाली होती. भीमा कोरेगावच्या लढाईला भारतातील अनुसूचित जातींमध्ये एक पौराणिक दर्जा प्राप्त झाला . भीमा-कोरेगावच्या लढाईतील विजयाला दलित पेशव्यांनी केलेल्या अन्यायाविरुद्ध महारांचा विजय मानतात. त्याची आठवण म्हणून बुलढाण्यातील आंबेडकर अनुयायानी तसेच महामानव ग्रुपच्या वतीने भव्य मिरवणीक् काढली होती.

# वर्षाच्या पहिल्याच दिवशी संभाजी ब्रिगेड सह शेतकऱ्यांचे चटणी भाकर आंदोलन..



जनसंचलन/बुलढाणा

राज्य सरकारने जाहीरनाम्यामध्ये आश्वासन दिल्याप्रमाणे त्वरित विना अटी व शर्ती न लावता सरसकट कर्जमाफी करून शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा शेतकऱ्यांचे मागील वर्षाचे कृषिमंत्र्यांनी मंजूर केलेले हक्काचे रखडलेले पिक विम्याची रक्कम तात्काळ खात्यावर जमा करावी यासह अन्य मागण्यासाठी आज बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर संभाजी ब्रिगेड आणि शेतकऱ्यांनी ठेचा भाकर खाऊन आंदोलन करून सरकारचे लक्ष वेधले आहे तर यावेळी शेतकऱ्यांनी दिलेल्या सरकार विरोधी घोषणाबाजी ने परिसर दणाणला आहे..


# संतोष देशमुख यांच्या हत्ये प्रकरणी मुख्य सुत्रधार व मारेकऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाई करा..

## बुलढाणा शहरातील समाजबांधवानी जिल्हाधिकारी यांना निवेदन देउन केली मागणी

जनसंचलन/बुलढाणा



मत्साजोग तालुका केज जिल्हा बीड येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाने संपुर्ण महाराष्ट्र हादरला आहे संपूर्ण राज्यात काळीमा फासणारी अशी ही घटना बीड जिल्ह्यातील मत्साजोग येथे घडली. एक गावचा सुशिक्षित सरपंचाची दिवसाढवळ्या गुंडांकडून हत्या केली जाते ही बाब महाराष्ट्राची कायदा सुव्यवस्था किती खालच्या पातळीला गेली आहे याचे ज्वलंत उदाहरण आहे.या हत्यामुळे बीड जिल्हा नव्हे तर संपूर्ण राज्य हादरले आहे.हे राज्य कायद्याचे आहे.अधोरेखित करण्यासाठी या प्रकराणातील मुख्य सूत्रधार व मारेकरी यांना तात्काळ शासन करणे गरजेचे आहे या प्रकरणातील मुख्य सूत्रधार हा राजकीय वरधास्त खाली असल्याचे बोलले जाते याबाबत प्रसार माध्यामातून मोठया प्रमाणात चर्चा आहे त्यामुळे जनसामान्यामध्ये मोठा रोष वाढला आहे. वाल्मीक कराड या व्यक्तीचे नाव या प्रकराणात जोडल्या गेल्याने व बीड आणि वाल्मीक कराड हे समीकरण असल्याने सर्व समाजबांधवांमध्ये तीव्र असंतोषाची भावना आहे.तसेच या व्यक्तीवर अनेक हत्या व गुन्ह्यात सहभाग असल्याचे बोलले जाते.जनभावनेचा विचार करून व मृतक देशमुख कुटुंबाला न्याय देण्यासाठी शिवाय जनसामानसामध्ये हे राज्य कायद्याचे आहे हि प्रतिमा कायम राहावी यासाठी सूत्रधार व आरोपींना कडक शासन करणे गरजेचे आहे संतोष देशमुख यांच्या हत्ये प्रकरणातील सर्व आरोपींना शोधून त्यांना कठोरात कठोर शिक्षा करण्यात यावी अन्यथा तिव्र आंदोलन करण्यात येणार असा इशारा सुध्दा या वेळी देण्यात आला आहे. तसेच त्यांच्या कुंटूबीयांना आर्थिक मदतीचा हातभार देणे हे देखील गरजेचे आहे.घरातील कर्ता व्यक्ती गेल्याने देशमुख परिवार हा उघड्यावर आला आहे त्यामुळे शासनाने त्यांन भरीव आर्थिक मदत देउन कुटुंबातील व्यक्तींना नोकरी द्यावी अशी मागणी यावेळी निवेदन देतांना बुलढाणा शहारातील सर्व सामाजबांधवानी केली आहे.



# डॉ.प्रवीण घोंगटे म्हणतात माहिती देता येत नाही!

## माहिती अधिकार सलाईनवर!

## बोगस दिव्यांग प्रमाणपत्राचा घोळ कायम! आता अशा अधिकाऱ्यांना बूस्टर डोस कोण देणार?

**जनसंचलन/बुलढाणा**

बोगस दिव्यांग प्रमाणपत्राचा घोळ कायम असून,या संदर्भातील माहिती अधिकार कायद्यान्वये मागितलेल्या माहितीला केराची टोपी दाखवण्यात आली आहे. कार्यालयीन जन माहिती अधिकारी तथा निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रवीण घोंगटे यांनी न्यायालय व्यतिरिक्त माहिती देता येत नाही, असे स्पष्टीकरण दिले आहे. विषय असा आहे की,बोगस दिव्यांग प्रमाणपत्राचे जिल्ह्यात पेव फुटले आहे. शासनाची दिशाभूल व फसवणूक केल्या जात आहे. शासनाच्या विविध विभागात दिव्यांग कर्मचारी कार्यरत आहेत. मात्र काही बोगस दिव्यांग यांनी शासनाची फसवणूक करुन बोगस दिव्यांग प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतले आहे. बुलडाणा जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कार्यालय बुलडाणाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ जोडपत्र-अ नुसार मौजे देऊळघाट, ता.जि.बुलडाणा या गावातील रहिवाशी असलेल्या दि.०१/०१/२०००ते३०/०६/२०२४ या कालावधीतील माहिती ही दि.२५/०७/२०२४ते०७/०८/२०२४ पर्यंत रितसरपणे अर्जदार अलीम खान खलील खान रा. देऊळघाट यांनी जिल्हा शल्य चिकीत्सक कार्यालय बुलडाणा यांचे जनमाहिती अधिकारी यांचेकडे केली होती.दरम्यान डॉ.प्रविण घोंगटे, कार्या. जनमाहिती अधिकारी तथा निवासी वैद्यकीय




अधिकारी, जिल्हा रुग्णालय बुलडाणा यांनी माहिती तर दिली नाही, मात्र सदरची बाब ही गोपनीय असल्याने सार्वजनिक हित लक्षात घेता न्यायालया व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस पुरविण्यात येऊ शकत नाही,असे स्पष्ट पत्रात नमूद केले. इतकेच नव्हे तर अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील सुधारीत कायदा पर्सन विथ डिसॲबीलीटी ॲक्ट वर्कींग ड्राफ्ट पार्ट ३ मधील राईट टू प्राईव्हसी कलमान्वये माहिती देता येणे शक्य नाही, अशी वेगवेगळी कारणे नमूद करुन माहिती देण्यास स्पष्ट नकार दिला. त्यामुळे जोडपत्र-ब नुसार अपील केली असता, समाधानकारक उत्तर न मिळाल्याने जोडपत्र-क नुसार मा.आयुक्त, अमरावती विभाग अमरावती यांचेकडे सुध्दा पत्रव्यवहार केला, मात्र त्यास सुध्दा बराच अवधी होवून सुध्दा कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. त्यामुळे मौजे देऊळघाट येथील रहिवाशी असलेल्या दिव्यांग बाबत माहिती देण्यास जिल्हा शल्य चिकित्सक बुलडाणा कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी हे पूर्णपणे दूर्लक्ष करीत असल्याचे दिसून येते. वास्तविक पाहता, माहिती अधिकार अधिनियम २००५ ची अंमलबजावणी होणे गरजेचे असतांना या बाबींकडे डोळेझाक करुन सर्वसामान्य नागरिकांना एक प्रकारे हुलकावण्यात येत आहे.वास्तविक पाहता अर्जदाराने वैयक्तिक माहिती न मागता, सार्वजनिकरित्या मागितली असतांनाही माहिती अधिकार कायद्याची अवहेलना केल्या जात आहे. तर सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळेल का ? अशी शंका निर्माण झाली आहे.

# १ जानेवारी रोजी वियोगी महाराज जयंती सोहळ्याच्या संपन्न




**जनसंचलन/बुलढाणा**

मलकापूर तालुक्यातील उमाळी हे गाव संत वियोगी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेला आहे त्यानिमित्त सालाबाद प्रमाणे यावर्षीही एक जानेवारीला संत शिरोमणी वियोगी महाराज यांचा जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळेस मा.आमदार चैनसुख संचेती भाजप प्रदेश उपाध्यक्ष यांनी काल्याच्या कीर्तनाला उपस्थित राहून भाविकांना संबोधित केले. त्यांनी वियोगी महाराजांच्या विचारांची आठवण करून दिली आणि नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमादरम्यान, इंजी. कोमलताई सचिन तायडे, संस्थापक अध्यक्ष, जनक्रांती फाऊंडेशन आणि जिल्हा उपाध्यक्षा, जिजाऊ ब्रिगेड यांच्या नवीन वर्षाच्या दिनदर्शिकेचे विमोचन माननीय आमदार चैनसुख संचेती यांच्या हस्ते करण्यात आले. हा सोहळा भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. नव्या वर्षाच्या प्रारंभी अशा आध्यात्मिक आणि सामाजिक उपक्रमांमुळे भाविकांमध्ये सकारात्मक ऊर्जा आणि प्रेरणा संचारली.

# परिचय मेळाव्यासाठी गावागावात बैठका



**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्र मराठा सोयरीक संघाच्या वतीने ५ जानेवारी रोजी उपवर-वधू परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या पूर्वतयारीसाठी बुलढाणा तालुक्यातील गावागावात बैठका घेण्यात येत आहेत. येळगाव येथे गजानन गडाख यांच्या निवासस्थानी नुकतीच बैठक झाली. सामूहिक विवाह सोहळे ही काळाची गरज आहे. सध्या शेतकरी वर्ग प्रचंड हलाखीत असून, आत्महत्येच्या दारात उभा आहे. अशा वेळी सामूहिक विवाह ही संकल्पना स्वीकारल्यास समाजासाठी ती हितकारक आहे. या उद्देशाने सुनील जवंजाळ पाटील यांनी प्रयत्न सुरू केले असून, उपवर-वधू परिचय मेळावे नि:शुल्कपणे घेण्याचा उपक्रम त्यांनी हाती घेतला आहे. बैठकीमध्ये बुलढाणा शहरामध्ये ५ जानेवारीला गर्दे हॉलमध्ये होणाऱ्या सकल मराठा उपवर-वधू परिचय मेळाव्यासंबंधी गावकऱ्यांना माहिती करून देण्यात आली. त्याचबरोबर पालकांना मुला - मुलींना सोबत घेऊन मेळाव्याला उपस्थित राहण्याचे आवाहन या बैठकीच्या निमित्ताने महाराष्ट्र मराठा सोयरीकचे संकल्पक सुनील जवंजाळ यांनी केले. डोंगर खंडाळा, शिरपूर, अंबोडा, पाडळी, धाड अशा विविध ठिकाणी समाजाच्या बैठका पार पडल्या व उर्वरित ठिकाणी बैठकांचे सत्र सुरू आहे. प्रा. नवनीता चव्हाण विजय पडोळ, विजय नेमाडे, पंडित काकडे, सागर बोकाडे, नीलेश खंडागळे आदी यावेळी उपस्थित होते.

